# बिबट्याचा हल्ला झाल्यास काय करावे..



घाबरू नये आणि पळून जाऊ नये. स्वत:ला शक्य तितक्या मोठे दाखवा. आक्रमक व्हा. ठाम आदेशांसह मोठ्याने ओरडून सांगा. एवढ्याने तो बधत नसल्यास, हल्ल्याच्या तयारीत राहा.



बिबट्या सहसा मान, घसा किंवा डोक्याच्या मागच्या भागावर हल्ला करतात. आपले हात आणि पायांचा कवच म्हणून वापर करत या नाजूक भागांचे संरक्षण करा.



**त्वेषाने लढा. आपण जगू शकता. कान / नाक / घशासारख्या बिबट्याच्या चेहऱ्याच्या दुर्बल भागावर हल्ला करा. ओटीपोटात लाथ मारा. दुखापत टाळण्यासाठी ते मागे सरतात.**

Activate Windows
Go to Settings

## *बिबट्याचे रूपांतरण / अनुकूलन*

• समक्षेत्रीत मांसाहारी प्राणी असून वाघांची घनता जास्त असणाऱ्या अधिवासात कमी घनतेत आढळतो, परंतु एका बाजूला वाघ आणि दुसरीकडे लागवडीखालील जमीन आणि मानवी वस्ती अश्या कात्रीत सापडतो, आणि जेथे वाघांची संख्या जास्त किंवा वाढत आहे, तिथे वाघ त्याला मानवी वस्तीच्या जवळपास असलेल्या भागात ढकलतात.

•त्यांच्याकडे घरी परतायची वृत्ती असते. (Homing instinct)

•बिबट्या उच्च मानवी घनतेच्या भागात (> 250 लोक / चौ.कि.मी.) राहू शकतो.

•चकवा देण्यात अत्यंत पटाईत, दबा धरण्यात आणि नजरेस न पडत लपून बसण्यात तज्ञ असतात

•सरळसोट उभ्या झाडांवर चढण्यात सक्षम असल्याने इतर शिकाऱ्यांपासून वाचण्यासाठी आपले भक्ष झाडावर लपवतात.

•एक अष्टपैलू शिकारी जो बेडूक, उंदीर आणि पक्ष्यांपासून ते आपल्या वजनाच्या ४ पट वजन असणाऱ्या सांबर, नीलगाय या प्राण्यांची शिकार करतो.

Activate Windows
Go to Settings